# <u>प्रेसनोट दिनांक ०६/०७/२०१९</u>

## <u>फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे</u>

### पोलीसांनी हरविलेला मोबाईल परत मिळवुन दिला.

फरासखाना पोलीस स्टेशन प्रॉपर्टी मिसींग रजि. नं. एल.आर.०२०६३७६२०१८ मधील इसम नामे कृष्णा विलास झवेरी, वय २० वर्षे, रा. ८७२/७३, रविवार पेठ, माणिक लॉज जवळ, पुणे यांचा दि. ०८/१२/२०१८ रोजी सॅमसंग ए ७ कंपनीचा मोबाईल फोन हरविला होता. त्याबाबत त्यांनी पुणे पोलीस वेब साईटवर ऑनलाईन तक्रार दिली होती.

सदरची तक्रार फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे प्राप्त झाल्यानंतर पोलीस नाईक मोहन दळवी यांनी सदर हरविलेल्या मोबाईल फोनचा आय.एम.ई.आय. नंबर ट्रेसिंग करीता लावला. सदरचा मोबाईल फोन हा दि. ०१/०६/२०१९ ते दि. ०५/०६/२०१९ दरम्यान चालु असल्याचे त्यांचे निदर्शनास आले. त्यावरुन त्यांनी मोबाईल कंपनीशी पत्र व्यवहार करुन, सदरचा मोबाईल फोन हा इसम नामे सुरज रामचंद्र वाल्मिकी रा. १५५/२, हिरामण मोझे नगर, येरवडा, पुणे हे वापरत असल्याची माहिती काढली.

पोलीस नाईक मोहन दळवी यांनी सदर पत्त्यावर जावुन इसम नामे सुरज रामचंद्र वाल्मिकी यांच्याकडुन वर नमुद मोबाईल फोन प्राप्त केला आहे. त्यानंतर सदरचा मोबाईल फोन हा त्याचे मुळमालक कृष्णा विलास झवेरी, यांना परत केला आहे. कृष्णा झेवरी यांनी त्यांना मोबाईल फोन पोलीसांनी परत मिळवुन दिल्याने पोलीसांचे आभार मानले आहे. आकाश वाल्मिकी, पोशि अमेय रसाळ यांनी त्याचा शोध घेवुन, त्यास दाखल गुन्ह्यात अटक केलेली आहे.

वरील नमुद कामगिरी ही श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. नंदकिशोर शेळके, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक मोहन दळवी यांनी केलेली आहे.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे